हिंगोली जिल्ह्याकरिता नवीन कामगार भवन बांधकामास प्रशासकीय तथा वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-०२२६/प्र.क्र.५०/काम-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १३ मे, २०२६.

**संदर्भ:-**

१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९५/काम-८, दि.०७.१२.२०२३.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.२०.०९.२०१९.
३) कामगार आयुक्त यांचे पत्र क्र. आस्था/हिंगोली/का.भ/२०२६/कार्या-०३/१३१, दि.१८.०२.२०२६.
४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांचे पत्र क्र. जा. क्र. मुअनां/२०२४-२५/३३३२, दि.०९.१२.२०२५.
५) कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, हिंगोली यांचे जा. क्र. ताशा/२०२५-२६/५३०५/EST-०२, दि.०९.१२.२०२५ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना:-**

राज्यातील संघटित व असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सोईसाठी व कामगार विभागांतर्गतची सर्व कार्यालये एका छताखाली आणण्याच्या उद्देशाने प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कामगार भवन उभारण्याचा शासनाचा मानस आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. १ येथील दि.०७.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कामगार भवन उभारण्यास व त्याच्या बांधकामास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच, प्रत्येक जिल्ह्यामध्ये कामगार विभागाची कार्यरत असलेली कार्यालये व त्या कार्यालयांतील आकृतीबंधानुसार शासकीय मानकाप्रमाणे आवश्यक असलेली जागा यांचा विचार करुन कामगार भवनाचे ४ प्रकारांमध्ये वर्गीकरण करण्यात आले असून, त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करुन घेण्यात आलेल्या अ, ब, क व ड या चार प्रकारच्या योजना/संकल्प आराखडे (Type Plan) यांना दि.२८.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये राज्यातील कामगार भवनांच्या उभारणीसाठी कामगार आयुक्त, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले असून, कामगार भवन उभारण्याकामी अनुसरावयाची कार्यपद्धती देखील विशद करण्यात आली आहे. कामगार भवनाच्या सदर वर्गीकरणामध्ये हिंगोली जिल्ह्याचा समावेश “ड” प्रकारामध्ये करण्यात आला असून, हिंगोली येथे कामगार भवन उभारण्याचे प्रस्तावित आहे. हिंगोली येथील प्रस्तावित कामगार भवनामध्ये (प्रशासकीय इमारत) कामगार प्रभागांतर्गत असलेले सरकारी कामगार अधिकारी हिंगोली यांचे कार्यालय, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे कार्यालय, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ यांचे

कार्यालय, हिंगोली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे कार्यालय व सुरक्षा रक्षक मंडळ यांचे कार्यालय इ. स्थलांतरित करण्यात येणार आहे.

२. हिंगोली येथील सरकारी कामगार अधिकारी यांचे कार्यालय सद्य:स्थितीत भाडेतत्त्वावर खाजगी इमारतीत कार्यरत आहे. अपुऱ्या जागेअभावी दैनंदिन कामकाज करण्यास अडथळा निर्माण होतो. तसेच, शासनाचा निधी इमारतीच्या भाडे पोटी खर्च होतो. सदर कार्यालयासाठी मौ. हिंगोली येथील सर्वे क्र. ६० मधील १८ आर व सर्वे क्र. ६३ मधील १५ आर अशी एकूण ३३ आर शासकीय जमीन जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दि.०१.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये कामगार भवन इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध करुन दिली असून, त्याची ताबा पावती प्राप्त आहे असे सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली यांनी त्यांच्या दि.१८.११.२०२५ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे.

३. कामगार आयुक्तालयाने संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये हिंगोली येथे कामगार भवन (नवीन प्रशासकीय इमारत) बांधण्यासाठी रु.१४,१२,३५,०००/- (रु.चौदा कोटी बारा लाख पस्तीस हजार फक्त) (सर्व करांसहित) इतक्या रकमेचा प्रस्ताव मुख्य अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांच्या तांत्रिक मान्यतेने शासन मान्यतेकरिता सादर केला आहे. सदर बाब विचारात घेता, हिंगोली येथे कामगार भवन (प्रशासकीय इमारत) बांधकामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

हिंगोली येथील कामगार भवन (नवीन प्रशासकीय इमारत) उभारण्यास मौ. हिंगोली येथील सर्वे क्र. ६० मधील १८ आर व सर्वे क्र. ६३ मधील १५ आर अशी एकूण ३३ आर (३३०० चौ.मी.) इतक्या क्षेत्रफळाच्या जागेत प्रशासकीय इमारत बांधकामासह (पार्किंग मजला २७१.४० चौ.मी., तळमजला ५२४.०६ चौ.मी., पहिला मजला ७९५.४६ चौ.मी., दुसरा मजला ७९५.४६० चौ.मी.) विद्युतीकरण, आग प्रतिबंधक, पाणी पुरवठा व मलनि:सारण, संरक्षक भिंत व गेट, अंतर्गत रस्ते, भू-विकास, पार्किंग, फर्निचर इ. साठी **रु.१४,१२,३५,०००/- (रु.चौदा कोटी बारा लाख पस्तीस हजार फक्त)** इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.
२. ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.
३. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि.१०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.
४. तांत्रिक मंजूरी देताना राज्यदरसूची बाह्य बाबींच्या दराकरिता शासन परिपत्रक क्र.२०१७/प्र.क्र.११/नियोजन-३, दिनांक ११.०४.२०१७ अनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५. प्रस्तावित प्रस्तावातील खरेदीशी संबंधित बाबींकरिता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन विभागाच्या दि.०१.१२.२०१६ व दि.२४.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील निर्गमित सूचना तसेच वेळोवेळी झालेल्या सुधारित सूचना विचारात घ्याव्यात.

६. मुख्य अभियंता (स्थापत्य) सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्या दि.०४.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी कामगार आयुक्तालयाची राहील.

७. इमारतीमध्ये दिव्यांगाकरिता उपलब्ध करुन द्यावयाच्या विविध सोयींबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

८. कार्यान्वयीन यंत्रणेने तोंडी दिलेल्या सूचनांच्या आधारावर कामाच्या व्याप्तीत बदल किंवा नवीन कामे समाविष्ट होणार नाहीत तसेच, विषयांकित कामाकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही यादृष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

९. नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात याव्यात.

१०. स्थापत्य कामाच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.

२. हिंगोली येथील कामगार भवन इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकाचा सविस्तर गोषवारा खालीलप्रमाणे आहे:-

| **Name of the Department: Industries, Energy Labour and Mining Department** | | | | |
|---|---|---|---|---|
| **Name of Work: Construction of Administrative Kamgar Bhavan Office Building at Hingoli Tq. Dist. Hingoli.** | | | | |
| **RECAPITULATION SHEET** | | | | |
| **Sr. No.** | **PARTICULAR ITEM** | **NORMS (Units Rate Rs. (Sqmt/M/Rgm/LumpSum etc.)** | **Cost Rs.** | |
| | | | **Component Wise** | **Total** |
| **(A)** | **ESSENTIAL ITEMS (Components)** | | | |
| 1 | **(a) Building proper (Built Up Area-sq.m)** | Proforma Estimate | | |
| | **Kamgar Bhavan Hingoli** | | | |
| | 1) Stilt/Parking Floor 271.40 | 16000.00 | per sqm | 4342400.00 |
| | 2) Ground Floor 524.06 | 33700.00 | per sqm | 17660822.00 |
| | 3) First Floor 795.46 | 27000.00 | per sqm | 21477420.00 |
| | 4) Second Floor 795.46 | 28350.00 | per sqm | 22551291.00 |
| | **Total B.U.A.= 2114.98 Sq. M** | | | |
| | | | **Sub Total (a)** | **66031933.00** |
| | | | | |
| | (b) Fuel Gas Pipeline | | | 0.00 |
| | (c) Bio Digester | | | 0.00 |
| | (d) Rain/Roof Water Harvesting sqm 2114.98 | 600.00 | | 1268988.00 |
| | (e) Solar Roof Top (MoU to be executed) | Lumpsum | | 500000.00 |
| | (f) Ramp for Handicaps | Lumpsum | | 200000.00 |
| | (g) Furniture sqm 1586.24 | 5000.00 | | 7931175.00 |
| | | Sub Total 1 (b+c+d+e+f+g) | | **9900163.00** |
| 2 | Water Supply & Sanitary Works 5% | Sub Total (2) | 5% of 1 (a) | 3301596.65 |
| 3 | Electrification | 6% of (a) | | 3574996.62 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | a) Internal 5% | 5% of 1 (a) | | 3301597.00 |
| | b) External 6% | 6% of 1 (a) | | 3961916.00 |
| | Fire Fighting Arrangements etc | 7% of 1 (a) | | 4622235.00 |
| | | | **Sub Total (3)** | **11885748.00** |
| | **Sub Total A** | | | **91119440.65** |
| **(B)** | **MISCELLANEOUS ITEMS** | | | |
| | (1) Compound Wall & Gate (Rmt) 256 | 18000.00 | | 4608000.00 |
| | 88+39+90+39=256.00 Rgm×12000.0/RGM | | | |
| | (2) Internal CC Road as per layout 900 | 3300.00 | | 2970000.00 |
| | (200*5.50)SQM× 3300.00/SQM | | | |
| | (3)Development of Ground | | | 200000.00 |
| | (4) Parking Arrangement (Two + Four Wheeler) (15*6) 50 | 12000.00 | | 600000.00 |
| | (5) Retaining Wall | | | 0.00 |
| | (6) Garden and Land Scaping | Lumpsum | | 500000.00 |
| | (7) Soil Investigation & Detail Land Survey | | | 200000.00 |
| | (8) C C Drain (200*2 Rgm) 400 | 2500.00 | | 1000000.00 |
| | **Sub Total (B)** | | | **10078000.00** |
| | **Sub Total (A)=(1)+(2)+(3)+(B)** | | | **101197440.65** |
| **(C)** | **Optional Items** | | | |
| | 1) Underground Water Tank for R/W Harvesting (Cum) | Lumpsum | | 300000.00 |
| | 2) Water Main Storage and Pump house, bore well | Lumpsum | | 500000.00 |
| | 3) Air Conditioning | Lumpsum | | 300000.00 |
| | 4) Lifts | Lumpsum | | 3000000.00 |
| | 5) External Toilets | Lumpsum | | 0.00 |
| | 6) AB Rooom, Area Lighting, Pumps, Generator | Lumpsum | | 200000.00 |
| | 7) CCTV | Lumpsum | | 200000.00 |
| | **Sub Total (C)** | | | **4500000.00** |
| | **Project Cost (P)=(A)+(B)+(C)** | | | **105697440.65** |
| **(D)** | **PROVISIONS** | | | |
| | **(1) Contingencies 3 % on (a)** | | | **1980958.00** |
| | **(2) Green Building 5 % on (a)** | | | **3301597.00** |
| | **(3) GST 18% on (P)** | | | **19025539.00** |
| | **(4) Price Escalation 10% on (P)** | | | **10569744.00** |
| | **(5) Labour insurance 1% on** | | | **660319.00** |
| | **Sub Total (D)** | | | **35538157.00** |
| | **TOTAL COST OF ALL PROJECT (A+B+C+D)** | | | **141235597.65** |
| | **Say Rs.** | | | **1412.35 Lakhs** |

PLINTH AREA RATE FOR

| | |
|---|---|
| (i) Bldg Proper Cost | = Rs. 31221.07/Sqm |
| (ii) Elect. Work | = Rs. 5619.79/Sqm |
| (iii) Water Supply | = Rs. 1561.05/Sqm |
| (iv) For (i)+(ii)+(iii) | = Rs. 38401.91/Sqm |
| (v) Total Project Cost= TPC Area (as per “a”) | =Rs. 66778.69/Sqm |

३. हिंगोली येथे कामगार भवन (नवीन प्रशासकीय इमारत) बांधण्यासाठी येणारा खर्च मागणी क्र.के-४, २२३० कामगार व सेवायोजन (००) (०६) कामगार आयुक्तालयाचे बळकटीकरण करणे व कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे (२२३० ५८१९) या योजनांतर्गत योजनेखाली ६०-इतर भांडवली

खर्च या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा. उपरोक्त बांधकामासाठी टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बीडीएस) द्वारे वितरीत करण्यात येईल. त्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील वित्त विभागाच्या क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम (भाग-२), दि.२०.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उपविभाग- पाच अंतर्गत महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ (१) अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१३११३४२९५९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C963876 4849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41D DF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.05.13 12:01:24 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
२. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उ.ऊ.का. व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई.
७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड.
८. कामगार उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
९. सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली.
११. निवडनस्ती, कामगार-८